दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : २८७ • पुणे • गुरुवार, दि. ०९ जुलै २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

## ठळक बातम्या

### १० जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश

पिंपरी (आरंभ पर्व) : पिंपरी-चिंचवडमधील मोशीमध्ये एका कचरा डेपोत बुधवारी मोठी दुर्घटना घडली. एका इमारतीचा काही भाग अचानक कोसळून ढिगाऱ्याखाली जवळपास १५ ते २० कामगार अडकल्याची भिती व्यक्त केली जात आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. या दुर्घटनेत ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान, पोलीस, एनडीआरएफचे जवान, आर्मीचे जवान आणि स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडून बचावकार्य सुरू आहे. आता घटनास्थळी मंत्री गिरीश महाजन यांनी देखील भेट देत घटनेचा आढावा घेतला आहे. तसेच युद्धपातळीवर बचावकार्य सुरू असल्याची माहिती त्यांनी सांगितली. ढिगाऱ्याखालून आतापर्यंत १० जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आल्याची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना दिली. तसेच बचावकार्य सकाळपर्यंत सुरू राहणार असून सर्वांना सुखरूप बाहेर काढण्यात येईल, असंही महाजन यांनी सांगितलं आहे.

### बोगस डॉक्टरांविरुद्ध गुन्हे दाखल

अहिल्यानगर (आरंभ पर्व) : जिल्हा आरोग्य विभागाने बोगस डॉक्टरविरुद्ध सुरू केलेल्या शोध मोहिमेत गेल्या तीन महिन्यात ७ जणांविरुद्ध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल केले आहेत. यासंदर्भात आरोग्य यंत्रणेतील वैद्यकीय अधिकारी तसेच तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलिसांकडे फिर्यादी दाखल केल्या आहेत. जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी ही माहिती दिली. श्रीगोंद्यात दोन, पाथर्डी, शेवगाव, श्रीरामपूर, संगमनेर व राहुरी येथे प्रत्येकी एक बोगस डॉक्टर आढळला.

# शिंदे-फडणवीसांमध्ये सुप्त संघर्ष?

## महायुतीत ‘नो-एन्ट्री’ असा बोर्ड का लागला?

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील फोडाफोडीच्या राजकारणावर भाष्य करताना सत्ताधारी भाजपाप्रणीत महायुतीत यापुढे कोणताही नवा राजकीय पक्ष सामील होणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्यामुळे राज्यातील नव्या राजकीय समीकरणांच्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची दिल्लीत भेट घेतल्यानंतर मंगळवारी फडणवीसांनी मुंबईत माध्यमांशी संवाद साधला. भाजपा आता कोणत्याही नव्या पक्षाला महायुतीत सामावून घेणार नाही. आम्ही नव्या मित्रपक्षांसाठी आमचे दरवाजे बंद केले असून, पक्षाच्या विस्तारासाठी कोणाचाही पक्ष फोडण्याचा आमचा हेतू नाही. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात भाजपाकडून फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात असल्याच्या सर्व चर्चा पूर्णपणे निराधार आणि तथ्यहीन असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. गेल्या महिन्यात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ





शिंदे यांच्या पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यानंतर शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होणार असल्याच्या चर्चांनी जोर पकडला. त्यातच राष्ट्रवादीच्या एका वरिष्ठ नेत्याने मुंबईत भाजपाच्या प्रभावशाली नेत्याची भेट घेतल्याचे वृत्त समोर आल्यानंतर या चर्चांना आणखीनच हवा मिळाली. या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीत संभाव्य प्रवेशाबाबत चर्चा झाल्याची माहिती समोर आली. यादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेल्या स्पष्ट संकेताचे पडसाद मुंबईतील भाजपाच्या प्रदेश कार्यालयातही उमटल्याचे पाहायला मिळाले. विरोधी पक्षांतील कोणत्याही नेत्याला पक्षप्रवेशाबाबतचे आश्वासन देऊ नये, अशा सूचना भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना देण्यात आल्याचे सूत्रांकडून समजते. एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीत सध्याची स्थिती कायम राहणार असल्याचे संकेत दिले असले तरी दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतेच ‘ऑपरेशन टायगर’ राबवले. त्या अंतर्गत ठाकरे गटातील सहा खासदार आणि विधानपरिषदेच्या एका आमदाराने शिंदेसेनेत प्रवेश केला.

२०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर फडणवीस आणि शिंदे यांच्यातील संबंध ताणले गेले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली असतानाच ही घडामोड घडली. सूत्रांच्या माहितीनुसार, ऑपरेशन टायगर’ राबवले जात असताना राज्यातील भाजपाच्या वरिष्ठ नेते त्याविषयी फारसे उत्साही नव्हते.

अशा फोडाफोडीच्या राजकारणामुळे राज्यातील जनतेचे लक्ष सरकारच्या कामकाजापेक्षा पक्षांतराच्या राजकारणाकडे वळते, असे काही नेत्यांचे मत होते. त्याशिवाय या पक्षप्रवेशामुळे शिंदे गटाचे लोकसभेतील संख्याबर १३ इतके झाल्यामुळे त्यांची महायुतीतील राजकीय ताकद आणखीनच वाढणार असल्याची भीती काही नेत्यांना सतावत होती. त्याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात सुप्त संघर्ष होत असल्याची कुजबूजही सुरू झाली.

## गावराई सड्यावरील कातळशिल्पे चिरेखाणीच्या भक्ष्यस्थानी

**सावंतवाडी (दै. आरंभ पर्व)**

कुडाळ तालुक्यातील गावराई सडा येथे असलेली बहुसंख्य कातळशिल्पे चिरेखाणीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत. याठिकाणी २५ ते ३० कातळशिल्पे होती, असे स्थानिक रहिवासी सांगतात. मात्र आता तेथे हाताच्या बोटावर मोजण्याएवढी कातळशिल्पे उरली आहेत, अशी माहिती कातळशिल्प संशोधक सतीश लळीत यांनी दिली. गावराई हे छोटेसे निसर्गसुंदर गाव कसाल मालवण रस्त्यावर सुकळवाडजवळ आहे. गावातील गिरोबा मंदिराकडून एक घाटरस्ता गावाच्या उत्तरेला असलेल्या कातळसड्यावर जातो. या सड्यावर २५ ते ३० कातळशिल्पे होती. मात्र गेल्या काही वर्षात येथे सुरू झालेल्या एका मोठ्या चिरेखाणीत यापैकी बहुतेक कातळशिल्पे नष्ट झाल्याचे नुकत्याच केलेल्या पाहणीत आढळून आले, असे श्री. लळीत यांनी सांगितले. या पाहणीवेळी मिहिर प्रभाकर वाईरकर उपस्थित होते. सद्यस्थितीत फक्त पाचसहा कातळशिल्पे सुरक्षित असून त्यात एक मनुष्याकृती, दोन मासे, चतुष्पाद प्राणी आणि काही भौमितिक





आकृत्यांचा समावेश आहे. काही कातळशिल्पांवरून चिरे वाहतुकीच्या डंपर्ससाठी रस्ता तयार झाला आहे. एकीकडे शासन कातळशिल्पांची माहिती सर्वदूर पोचविण्यासाठी करोडो रुपये खर्चाचे माहितीपट तयार करण्याची घोषणा करीत आहे. मात्र रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातळशिल्पांचे सर्वेक्षण, जीपीएस मॅपिंग, संरक्षण या अत्यंत प्राथमिक बाबी ज्या तातडीने होणे गरजेचे आहे, त्याकडे लक्षच दिले जात नाही. युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत समाविष्ट केलेल्या कुडोपी येथील कातळशिल्पांच्या तीनपैकी एका क्लस्टरमध्ये चिरेखाणीसाठी टोकदार लोखंडी हत्याराने खोदून टेस्टिंग केल्याची घटनाही दिसून आली आहे. याआधी जिल्ह्यातील विर्डी, वडाचा पाट, खोटले येथील अनेक कातळशिल्पे अशाच प्रकारे नष्ट झाली आहेत.

## अतिवृष्टीचे रायगड जिल्ह्यात ११ जणांचा बळी

**अलिबाग (दै. आरंभ पर्व)**

रायगड जिल्ह्याला गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे आत्तापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दरड कोसळून ३ जण जखमी झाले आहेत. जुलै महिन्याच्या सुरवातीपासून रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस बरसत आहे. सतत होणाऱ्या अतिवृष्टीमुळे अंबा, सावित्री, कुंडलिका, पाताळगंगा, भोगावती, बाळगंगा नद्यांची पाणी पातळी सतत वाढत आहे. त्यामुळे ठिकठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात ५५ ठिकाणी दरडी कोसळल्या. यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत आणि वित्तहानी झाली. जिल्ह्यात गेल्या सात दिवसात ११ जणांचा अतिवृष्टीमुळे मृत्यू झाला. ज्यात पनवेल तालुक्यात ४, कर्जत तालुक्यात ३, महाड तालुक्यात २, तर अलिबाग आणि तळा



तालुक्यातील प्रत्येकी एक जणांचा समावेश आहे. महत्वाची बाब म्हणजे यात वर्षासहली जीवावर बेतण्याचे प्रमाणही लक्षणीय आहे.

तळा तालुक्यातील फळशेत कर्नाळा येथील वेदन जनार्दन भोसले याचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला. दिघोटी पनवेल येथील मच्छिंद्र गणपत गावंड, आपटा येथील प्रज्वल प्रदीप कांबळे, वाघाचीवाडी येथी सुमित यशवंत पवार यांचा बूडून मृत्यू झाला. खारघर येथील अश्रफ सद्दाम शेख याचा खेकडे पकडतांना बुडून मृत्यू झाला.

## मुलांनी सांभाळ केला नाही, तर दिलेली मालमत्ता आई-वडील परत घेऊ शकतात

### उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय!

> जर मालमत्ता हस्तांतरित करताना आई-वडिलांच्या मूलभूत गरजा आणि शारीरिक गरजांची काळजी घेण्याची अट असेल, आणि मुलाने ती पाळली नाही, तर ते हस्तांतरण रद्द करण्याचा पूर्ण अधिकार लवादाला आहे.
> **– मुंबई उच्च न्यायालय**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

वृद्धापकाळात सांभाळ करण्याच्या अटीवर आई-वडिलांनी मुलांना दिलेली मालमत्ता, मुलांनी शब्द न पाळल्यास परत घेतली जाऊ शकते, असा एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय मुंबई उच्च न्यायालयानं दिला आहे. विशेष म्हणजे, आई-वडील आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी असले, तरीही त्यांना हा अधिकार असेल, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्वाचा ठरणार आहे. हा संपूर्ण वाद मुंबईतील लोअर परळ परिसरातील आहे. येथील एका ६८ वर्षीय सराफा व्यावसायिकाने २००५ मध्ये एक फ्लॅट खरेदी केला होता. या घरात ते आपली बायको, मुलगा आणि सुनेसोबत राहत



होते. तब्बल १८ वर्षे एकत्र राहिल्यानंतर, मे २०२३ मध्ये वडिलांनी एका ‘गिफ्ट डीड’द्वारे (बक्षीसपत्र) हा फ्लॅट आपल्या ४२ वर्षीय मुलाच्या नावावर केला. हे बक्षीसपत्र करताना एकच अट होती, मुलाने वृद्ध आई-वडिलांचा सांभाळ करावा आणि त्यांच्या मूलभूत गरजा भागवाव्यात. मात्र नेमके याच्या उलटे झाले. बक्षीसपत्र झाल्यानंतर काही दिवसांतच घरात वाद सुरू झाले. मुला-सुनेचा त्रास इतका वाढला की, २०२५ मध्ये या वृद्ध दांपत्याला स्वतःचं घर सोडून बाहेर पडावं लागलं. अखेर वडिलांनी ‘ज्येष्ठ नागरिक देखभाल आणि कल्याण कायदा, २००७’ अंतर्गत असलेल्या लवादाकडे न्याय मागितला. लवादाने सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतर मुलाला मोठा झटका दिला. न्यायालयाने मुलाला आणि त्याच्या कुटुंबाला ६० दिवसांच्या आत तो फ्लॅट रिकामा करून वडिलांच्या स्वाधीन करण्याचे आदेश दिले. लवादाच्या या आदेशाविरोधात मुलाने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. “माझे वडील आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. त्यांचा स्वतःचा व्यवसाय आहे आणि इतरही मालमत्ता आहेत. ते हलाखीचे जीवन जगत नसून स्वतःचा खर्च उचलण्यास पूर्णपणे समर्थ आहेत,” असा युक्तिवाद मुलानं न्यायालयात केला. परंतु, प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अनखड यांच्या खंडपीठाने मुलाचा हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला. कायद्यातील अटींची पूर्तता होत नसेल, तर मुलाला दिलेले बक्षीसपत्र ‘बेकायदेशीर’ ठरवले जाऊ शकते. मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. “मुलगा सांभाळेल” या विश्वासाने आपली हक्काची कमाई मुलांच्या नावावर करणाऱ्या, पण नंतर उपेक्षित आयुष्य जगणाऱ्या वृद्ध माता-पित्यांसाठी हा कायदा आणि हा निर्णय संरक्षणाची भक्कम ढालच बनला आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



## खडकवासला जलाशय येथे पुणे महानगरपालिकेतर्फे जलपूजन

पुणे (आरंभ पर्व) : सालाबादप्रमाणे पुणे महानगरपालिकेतर्फे आज खडकवासला जलाशय येथे जलपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा व्हावा, तसेच नागरिकांना वर्षभर मुबलक पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने विधिवत जलपूजन करण्यात आले. यावेळी मा. आमदार श्री. भीमराव अण्णा तापकीर आणि पुणे महानगरपालिकेच्या माननीय महापौर श्रीमती मंजुषा ताई नागपुरे यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. या प्रसंगी पुणे महानगरपालिकेचे मा. उपमहापौर श्री. परशुराम वाडेकर, मा. सभासद श्री. सचिन मोरे, श्री. सोपान ऊर्फ काका चव्हाण, श्रीमती जयश्री ताई भूमकर, श्री. राजाभाऊ लायगुडे, श्रीमती कोमल ताई नवले, श्री. प्रसन्न दादा जगताप, श्रीमती अनिता ताई इंगळे, श्री. सुभाष नानेकर, श्रीमती धनश्री ताई कोल्हे, श्री. भारत भूषण बराटे तसेच जलसंपदा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विधिवत जलपूजन करण्यात आले. याप्रसंगी माननीय महापौर श्रीमती मंजुषा ताई नागपुरे यांनी पुणेकर नागरिकांना वर्षभर सुरळीत आणि पुरेसा पाणीपुरवठा होण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्नशील असल्याचे सांगत, यंदाचा मान्सून समाधानकारक ठरून धरणक्षेत्रात भरपूर पाऊस पडावा, अशी प्रार्थना केली.

## पुणे ग्रामीणमध्ये वाहतूक बदल : जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

पुणे (आरंभ पर्व) : श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी सोहळा सन २०२६ हा १३ जुलै रोजी जेजुरी मुक्काम १४ जुलै रोजी वाल्हा मुक्काम व १५ जुलै रोजी निरा येथे विसाव्यासाठी थांवणार आहे. सदर पालखी पायीबारी सोहळ्यात अंदाजे ७ ते ८ लाख भाविक हे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ पुणे ते पंढरपुर या मार्गाने पायी चालत असतात. तसेच सदर पालखी सोहळ्यामध्ये दिंड्याची वाहने मोठ्या प्रमाणावर असतात. त्यामुळे पालखी सोहळा कालावधीत वाहतुक कोंडी होवू नये व पालखी सोहळ्यास अडथळा निर्माण होवु नये याकरीता जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे जितेंद्र डूडी यांनी मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ मधील तरतूदीनुसार व शासन गृह विभागाचे दि.१९/०५/१९९० चे अधिसुचनेनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकाराने श्री संत ज्ञानेश्वर महाराज सोहळा सन २०२६, चे अनुषंगाने वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत खालील प्रमाणे वाहतुकीमध्ये बदल करुन पर्यायी मार्गाने वाहतुक वळविण्याचे आदेश दिले आहेत. जेजुरी पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीणः बेलसर फाटा:- अ) १० जुलै रोजी रात्री २० ते १३ जुलै रोजी रात्री २० वा या वेळेत बारामती, फलटण, सातरा बाजुकडून येणारी पुणे वाजुकडे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्णपणे बंद करुन बेलसर फाटा- वाघापुर चौक उरुळी कांचन मार्गे पुणे बाजुकडे वळवावी. (ब) १३ जुलै रोजी सकाळी २० वाजता ते १४ जुलै २०२६ रात्री २० वा.पर्यंत सासवड पुणे, उरुळी मार्गे सातरा, फलटण, लोणंद, बारामती येथे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्णपणे बंद करून ती बेलसर - कोथळे-नाझरे-काळा ओढा मार्गे मोरगाव कडे वळविण्यात येत आहे. मोरगाव चौक जेजुरी: अ) ११जुलै रोजी सकाळी २० वा. ते १४ जुलै रोजीचे दुपारी १५ वा. पर्यंत वाहतुक नियमन करणे. (ब) १४ जुलै रोजी दुपारी १५ वा ते १५ जुलै रोजीचे रात्री ११ वा. सासवड, पुणे, उरुळी मार्गे सातारा, फलटण, लोणंद, बारामती येथे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्ण पुणे बंद करुन ती मोरगाव-लोणीभापकर कोऱ्हाळे मार्गे फलटणकडे वळविण्यात येत आहे. पारगाव मेमाणे चौक पारगावः अ) दि.११जुलै रोजी सकाळी २० ते १३ जुलै रोजीचे दुपारी १७ वा. पुण्याकडे जाणारी सर्व वाहतुक हि सासवड व जेजुरी बाजुकडे जावु न देता ती उरुळी मार्गे वळविण्यात येत आहे. (ब) १४ जुलै रोजी १५ वा. ते १५ जुलै रोजीचे रात्री ११ वा. सासवड, पुणे, उरुळी मार्ग सातारा, फलटण, लोणंद, बारामती येथे जाणारी पालखी व्यतिरिक्त सर्व वाहतुक पुर्णपणे बंद करुन ती पिसर्वे-सुपा-लोणीभापकर कोऱ्हाळे मार्ग फलटण कडे वळविणेत येत आहे. छत्रपती शिवाजी चौक निरा: दि.१० जुलै रोजी रात्री २० वा. १५ जुलै रोजी ११ वा. यावेळेत सातारा, फलटण, लोणंद येथुन पुणेकडे जाणेसाठी जेजुरी-सासवड वाजुकडे जाणारी सर्व वाहतुक पुर्ण पुणे बंद करणेत येत आहे व सदरची वाहतुक निरा मोरगाव-सुपा-कडेगाव चौफुला मार्गे पुणे बाजुकडे वळविणेत येत आहे बेलसर गाव कोथळे चौक १० जुलै रोजी रात्री २० ते १४ जुलै रात्री ११ वा. या वेळेत जेजुरी मार्गे सातारा, फलटण, लोणंद बाजुकडे सर्व वाहतुक पुर्णपणे बेद करुन सदरची वाहतुक वेलसर कोथळे चौक-कोथळेगाव-नाझरे काळा ओढा गोगाय किंवा नाझरे- पांडेश्वर मार्गे सुपा मोरगाव अशी वळवावी.

## ८ ते ११ जुलैदरम्यान पुण्यात जड-अवजड वाहनांना प्रवेशबंदी

पुणे (आरंभ पर्व) : संत श्री ज्ञानेश्वर महाराज व संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालख्या ९ जुलै रोजी पुणे शहरात एकत्रित येत असल्याने पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने वारकरी सहभागी होणार आहेत. यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि वाहतूक सुरक्षित व सुरळीत ठेवण्यासाठी पुणे शहर वाहतूक शाखेने विशेष वाहतूक व्यवस्थापन लागू केले आहे. पोलीस उपआयुक्त (वाहतूक) डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी मोटार वाहन कायद्यातील अधिकारांचा वापर करून अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता ८ जुलै रोजी मध्यरात्रीपासून ११ जुलै रोजी मध्यरात्रीपर्यंत पुणे शहरात जड-अवजड वाहने, डंपर, मिक्सर व इतर संथगती वाहनांच्या प्रवेशावर बंदी घातली आहे. या कालावधीत अंतर्गत जड वाहतुकीलाही मनाई राहणार आहे. प्रवेशबंदी बोपोडी चौक, भुमकर चौक, कात्रज चौक, राजीव गांधी पूल (औंध), ब्रेमेन चौक, राधा चौक (बाणेर), सुस रोड, चांदणी चौक, वारजे जंक्शन, वडगाव पूल, मंतरवाडी फाटा, खडी मशिन चौक (कोंढवा), वैदवाडी चौक, खराडी बायपास, खराडी जकात नाका, तुळापूर फाटा, बोपखेल फाटा, थेऊर फाटा, केसनंद फाटा, दिवे घाट माथा, नावले पूल, रविदर्शन (हडपसर) आदी ठिकाणांपासून पुढील मार्गांवर लागू राहील. शहरातून इतर जिल्ह्यांकडे जाणाऱ्या वाहनांसाठी पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. सोलापूर, नगर, मुंबई, नाशिक तसेच कोल्हापूर, सांगली व सातारा येथून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांनी चौफुला–केडगाव–न्हावरे, आळेफाटा तसेच शिरवळ–निरा–सुपे–केडगाव मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, १२ जुलै रोजी संत तुकाराम महाराजांची पालखी लोणीकाळभोर येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार असल्याने ११ जुलै रात्री ११ ते १२ जुलै रोजी पालखी यवत मार्गे पुढे जाईपर्यंत थेऊर फाट्यापासून सोलापूरकडे जाणारी वाहतूक बंद राहणार आहे. या वाहतुकीसाठी थेऊर–केसनंद–वाघोली–लोणीकंद–नगर रोड–शिक्रापूर–न्हावरे–दौंड तसेच मगरपट्टा–खराडी बायपास–नगर रोड–शिक्रापूर–केडगाव–चौफुला हे पर्यायी मार्ग उपलब्ध असतील.

# 'पुणे प्रथम – सेवावारी २०२६' अंतर्गत वारकऱ्यांसाठी सर्वंकष सुविधा

- संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पुणे महानगरपालिका सज्ज- महापौर मंजुषा नागपुरे
- सेवाभाव, स्वच्छता आणि आधुनिक व्यवस्थापनाचा संगम



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे पुणे शहरात होणारे आगमन ही प्रत्येक पुणेकरासाठी श्रद्धा, सेवा आणि संस्कृतीचा उत्सव आहे. वारकऱ्यांची सेवा हीच खरी संतसेवा मानून पुणे महानगरपालिकेने सर्व विभागांना सज्ज ठेवले आहे. संतांनी दिलेला समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी 'पुणे प्रथम – सेवावारी २०२६' हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सर्व पुणेकरांनी प्रशासनाला सहकार्य करत सेवाभावाने या पवित्र सोहळ्यात सहभागी व्हावे.


**- मंजुषा नागपुरे, महापौर, पुणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आषाढी वारीचे मंगलमय वातावरण संपूर्ण पुणे शहरात अनुभवायला मिळत असून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पुणे महानगरपालिका सर्वतोपरी सज्ज झाली आहे. हजारो वारकरी भाविकांच्या सेवेसाठी 'पुणे प्रथम – सेवावारी २०२६' या उपक्रमांतर्गत शहरभर व्यापक नियोजन करण्यात आले असून पालखी मार्ग, मुक्कामस्थळे आणि प्रमुख ठिकाणी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'पुणे प्रथम – सेवावारी २०२६' या उपक्रमामध्ये पारंपरिक सेवाभावाला आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रभावी प्रशासनाची जोड देण्यात आली आहे. दोन्ही पालखी सोहळ्यांच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन पूर्ण केले असून स्वच्छता, अखंडित पाणीपुरवठा, तात्पुरती स्वच्छतागृहे, वैद्यकीय सेवा, आपत्कालीन प्रतिसाद पथके, प्रकाश व्यवस्था, अग्निसुरक्षा, वाहतूक समन्वय तसेच नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. महापौर मंजुषा नागपुरे यांनी महानगरपालिका आयुक्त, वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित विभागप्रमुखांसमवेत पालखी मार्ग तसेच विविध मुक्कामस्थळांचा आढावा घेत आवश्यक सूचना दिल्या. वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रत्येक विभागाला स्वतंत्र जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून संपूर्ण यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे.

सध्या शहरात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. पाणी साचणाऱ्या ठिकाणांवर उपाययोजना, आपत्ती व्यवस्थापन पथके, आरोग्य विभाग, अग्निशमन दल आणि क्षेत्रीय कार्यालयांमधील अधिकारी २४ तास सज्ज ठेवण्यात आले आहेत. पालखी मार्गावर स्वच्छता, सुरक्षितता आणि तातडीची मदत उपलब्ध राहील, यासाठी स्वतंत्र नियंत्रण व्यवस्था उभारण्यात आली आहे. पालखी सोहळ्यादरम्यान वाहतूक व्यवस्थेतील बदल, प्रशासनाकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक ती काळजी घ्यावी तसेच पालखी सोहळा सुरक्षित, स्वच्छ आणि भक्तिमय वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासन आणि पोलिस यंत्रणेला सहकार्य करावे. सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे

## बचावकार्य युद्धपातळीवर; उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोशी कचरा डेपो येथे सुरू असलेल्या बांधकामादरम्यान डोंगराचा काही भाग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, अग्निशमन दल, लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) तसेच अन्य बचाव पथके घटनास्थळी दाखल होऊन बचाव व मदतकार्य सुरू केले आहे. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव विनिता वेद सिंगल, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजयकुमार सूर्यवंशी तसेच पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर राबविण्याच्या सूचना दिल्या. दुर्घटनेत अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, तसेच जखमींवर तातडीने आणि प्रभावी वैद्यकीय उपचार उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. उपमुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार एनडीआरएफचे पथक घटनास्थळी दाखल होऊन बचावकार्य सुरू आहे. प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत.

## पुणेकर दिग्दर्शक आणि निर्मात्यांचे बॉलीवूडमध्ये यश

### 'बेबी डू डाय डू' चित्रपटाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चित्रपटसृष्टीमध्ये नावलौकिक मिळवण्याचे अनेकांचे स्वप्न असते, परंतु या क्षेत्रामध्ये संधी मिळणेही अनेकदा आव्हानात्मक ठरते . अशा या बॉलीवूड जगतामध्ये पुणेकर असलेल्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी केवळ संधीच मिळविली नाही तर बॉलीवूडमध्ये " बेबी डू डाय डू" या चित्रपटाच्या निमित्ताने घवघवीत यशही मिळवले. हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीला उतरला असून पुण्यातील बहुतांश चित्रपटगृहांमध्ये चित्रपटाच्या तिकीट खिडकीवर हाउसफुल बोर्ड झळकले आहेत.

सलीम सिबलिंग आणि पुणे 04 पिक्चर एलाएलपी यांनी निर्मिती केलेला हुमा कुरेशी यांची प्रमुख भूमिका असलेला 'बेबी डू डाय डू' हा हिंदी चित्रपट 3 जुलै रोजी प्रदर्शित झाला. चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक नचिकेत सामंत हे पुणेकर आहेत. सामंत यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'बेबी डू डाय डू' या चित्रपटाला पुण्यासह देशाच्या अनेक चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांनी हाउसफुल गर्दी केली




आहे. पुण्यातील औंध येथील वेस्टएंड मॉल येथे असलेल्या सिनेपोलीस चित्रपटगृहामध्ये अभिनेत्री हुमा कुरेशी, चित्रपटाचे दिग्दर्शक नचिकेत सामंत, अभिनेता, निर्माता साकिब सलीम, अभिनेता रचित सिंग आणि मरुधर शेखावत यांनी भेट दिली. चित्रपट निर्मिती संदर्भात आपले अनुभव सांगत कलाकार आणि निर्मात्यांनी प्रेक्षकांशी संवाद साधला. हुमा कुरेशी म्हणाल्या, बेबी डू डाय डू या चित्रपटाची निर्मिती आणि या चित्रपटातील भूमिका दोन्हीही माझ्यासाठी आव्हानात्मक होत्या. मी त्या प्रामाणिकपणे पार पाडले आहे. चित्रपट पूर्ण झाल्यानंतर हा चित्रपट आता पूर्णतः प्रेक्षकांचा झाला असून प्रेक्षकांनी या चित्रपटाला अधिकाधिक प्रेम द्यावे असे मी आवाहन करते. पुण्यासह महाराष्ट्र आणि देशाच्या अनेक भागांमध्ये असलेल्या चित्रपटगृहांमध्ये या चित्रपटाचे अनेक शो हाउसफुल झाले आहेत . माझ्यातील कलाकाराला यामुळे प्रोत्साहन मिळाले असून यांसारख्या अनेक कलाकृती भविष्यातही करण्याची प्रेरणा मिळाली आहे. प्रेक्षकांनी बेबी डू डाय डू हा चित्रपट स्वतःचा आहे असे समजून चित्रपट अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावा. चित्रपटाला आता मिळणारे प्रेम असेच कायम राहावे. त्यामुळे एक अभिनेत्री आणि निर्माता म्हणून अशाप्रकारे अनेक कलाकृती भविष्यातही करता येतील असे आवाहनही हुमा कुरेशी यांनी यावेळी प्रेक्षकांना केले.

नचिकेत सामंत म्हणाले , प्रेक्षकांच्या चित्रपटासाठी मिळालेल्या प्रेमाबद्दल मी अत्यंत आभारी आहे. मी ज्या ठिकाणी वाढलो त्या पुण्यामध्ये माझ्यावर एक कलाकार म्हणून प्रेक्षकांचे प्रेम पाहून अत्यंत भारावून गेलो आहे. माझ्या स्वतःच्या शहरांमध्ये मिळणारे हे प्रेम एक प्रकारे माझ्यावर कौतुकाची थाप आहे यामुळे अशा प्रकारचे काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळते.

साकिब सलीम म्हणाले, चित्रपटाला मिळणारे प्रेम पाहून आम्ही गेल्या तीन वर्षांपासून या चित्रपटासाठी घेतलेल्या मेहनतीचे चीज झाल्यासारखे वाटते. या चित्रपटाच्या निर्मितीसाठी कोणताही मोठा स्टुडिओ अथवा निर्मिती संस्था आमच्या पाठीशी नाही. प्रेक्षकांचे मिळणारे प्रेम आणि प्रतिसाद हीच आमच्यासाठी ऊर्जा असून प्रेक्षक हा चित्रपट निश्चितच सुपरहिट करतील याची मला खात्री आहे.

## एकता नगर व विठ्ठल नगर परिसराला पहाटे महापौर यांची भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्यानंतर संभाव्य पूरस्थितीचा आढावा घेण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या माननीय महापौर मंजुषा ताई नागपुरे यांनी आज पहाटे सिंहगड रस्त्यावरील एकता नगर व विठ्ठल नगर या संभाव्य बाधित परिसरांची प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी महापौरांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले. या प्रसंगी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनामार्फत आवश्यक सूचना देण्यात आल्या. नदीपात्रालगत तसेच सखल भागात राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे आणि आवश्यकता भासल्यास सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महापौर मंजुषा ताई नागपुरे यांनी केले.

महापौर म्हणाल्या, "पुणे महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचनांचे पालन करावे. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेसाठी महानगरपालिका पूर्णपणे सज्ज असून आवश्यक ती सर्व मदत तातडीने उपलब्ध करून दिली जाईल." पाहणीदरम्यान स्थानिक नागरिक उपस्थित होते. त्यांच्या सूचनांची दखल घेत संबंधित यंत्रणांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

## संघर्षाची हृदयस्पर्शी कहाणी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मराठी झी५ वर १० जुलैपासून प्रदर्शित होणारा मूळ मराठी चित्रपट 'फ्रेम' प्रेक्षकांसमोर व्यावसायिक जबाबदारी आणि मानवी संवेदनशीलता यांच्यातील संघर्षाची प्रभावी कथा घेऊन येत आहे. दिग्दर्शक विक्रम पटवर्धन यांच्या लेखन-दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या सामाजिक नाट्यात नागराज मंजुळे, अमेय वाघ, मुग्धा गोडसे आणि अक्षया गुरव यांच्या प्रमुख भूमिका आहेत. पुण्यातील एका वृत्तपत्राच्या वृत्तकक्षाच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या या चित्रपटात अनुभवी छायाचित्र वार्ताहर चंदू पानसरे आणि आदर्शवादी नवोदित सिद्धार्थ देशमुख यांच्या विचारांचा संघर्ष




केंद्रस्थानी आहे. "आधी छायाचित्र, मग बाकी सगळं" या भूमिकेवर ठाम असलेला चंदू आणि माणुसकी जपत पत्रकारिता करण्यावर विश्वास ठेवणारा सिद्धार्थ यांच्या प्रवासातून पत्रकारितेतील नैतिक मूल्यांचा वेध घेण्यात आला आहे. कथानकाला कलाटणी देणाऱ्या विनाशकारी भूकंपानंतर मृत्यू, विध्वंस आणि जगण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांचे वास्तव टिपताना या दोघांसमोर कठीण प्रश्न उभे राहतात.

# नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य – महापौर मंजुषा नागपुरे

### मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विविध भागांत झाडे कोसळणे, रस्त्यांवर पाणी साचणे, घरांमध्ये व कॉलनींमध्ये पाणी शिरणे, भिंती व रस्ते खचणे तसेच वाहतुकीवर परिणाम होण्याच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने केंद्रीय राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधर अण्णा मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली पुणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागात आज आढावा बैठक घेण्यात आली.



बैठकीत शहरातील सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध विभागांकडून सुरू असलेल्या उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी करण्यात आलेली तयारी तसेच विभागांमधील समन्वय यावर सखोल चर्चा करण्यात आली. कोणतीही आपत्ती उद्भवल्यास संबंधित विभागांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून आवश्यक मदत व उपाययोजना कराव्यात, नागरिकांना त्वरित सहाय्य उपलब्ध करून द्यावे आणि सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून परिस्थितीवर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशा स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या.

यावेळी महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिका नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पूर्णपणे सज्ज असून सर्व विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, अग्निशमन विभाग, आरोग्य विभाग, क्षेत्रीय कार्यालये तसेच इतर संबंधित विभाग २४ तास कार्यरत असून नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण झाल्यास तातडीने मदत उपलब्ध करून देण्यात येईल. नागरिकांनीही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक असल्यास महानगरपालिकेच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. या बैठकीस पुणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. नवल किशोर राम, सभागृह नेते श्री. गणेशजी बिडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्री. श्रीनाथ भिमाले, उपमहापौर श्री. पुरुषोत्तम वाडेकर, विरोधी पक्षनेते श्री. निलेश निकम, पक्षनेते श्री. नितीन गावडे, श्री. रामचंद्र कदम तसेच सहकारी नगरसेवक, संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. ०९ जुलै २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे

### मॅक्सियन व्हील्सच्या पहिल्या 'फॉमरि' बॅचचा पदवीदान सोहळा संपन्न



पुणे (आरंभ पर्व) : प्रवासी कार, हलकी व्यावसायिक वाहने, बस, जड व्यावसायिक वाहने आणि ट्रेलर्ससाठी चाके (व्हील्स) तयार करणाऱ्या जागतिक आघाडीच्या मॅक्सियन व्हील्सने आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भारतातील 'फॉमरि' कार्यक्रमाच्या पहिल्या तुकडीच्या विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याच आयोजित समारंभात या कार्यक्रमाच्या दुसऱ्या तुकडीचेही उद्घाटन करण्यात आले.यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, मॅक्सियन व्हील्सचे ग्लोबल ह्युमन रिसोर्सेस, सेफ्टी अँड सस्टेनेबिलिटी विभागाचे उपाध्यक्ष मार्क सिनार, कल्याणी मॅक्सियन व्हील्सचे व्यवस्थापकीय संचालक राहुल वैद्य, विद्यापीठाचे प्रतिनिधी, पदवीधर आणि नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

### पुण्यात ९ ते ११ जुलैदरम्यान वाहतुकीत तात्पुरते बदल

पुणे (आरंभ पर्व) : संत श्री ज्ञानेश्वर महाराज व संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालख्या ९ जुलै रोजी पुणे शहरात एकत्रित येणार असून, १० जुलै रोजी मुक्काम आणि ११ जुलै रोजी पुणे शहराबाहेर प्रस्थान करणार आहेत. पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने वारकरी पायी सहभागी होत असल्याने वाहतूक सुरक्षित, सुरळीत व नियोजनबद्ध राहावी यासाठी पुणे शहरात विशेष वाहतूक व्यवस्थापन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायद्यातील तरतुदींचा वापर करून पोलीस उपआयुक्त (वाहतूक) डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी ९ जुलै रोजी पहाटे ००.०१ वाजल्यापासून ते ११ जुलै २०२६ रोजी रात्री २४ वाजेपर्यंत पालखी मार्ग व परिसरातील वाहतुकीत तात्पुरते बदल लागू केले आहेत. अत्यावश्यक सेवेतील वाहने (अग्निशमन दल, पोलीस, रुग्णवाहिका, पेट्रोल-डिझेल वाहतूक करणारी वाहने, लग्नसमारंभाची वाहने आदी) या निर्बंधातून वगळण्यात आली आहेत. समर्थ वाहतूक विभागांतर्गत खालील मार्गांवर सर्व प्रकारच्या वाहनांच्या प्रवेशास मनाई करण्यात आली आहे. इनामदार चौक, समाधान चौक, नाना चावडी व चाचा हलवाई चौकाकडुन अरुणा चौककडे सर्व प्रकारची वाहने घेऊन जाणेस मनाई करण्यात येत आहे. मनुषा मस्जिद चौककडून पारशी अग्यारी चौकाकडे वाहने घेऊन जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

### एचडीएफसी अर्गो करणार बिमा योजनेची अंमलबजावणी

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी या भारतातील खाजगी क्षेत्रातील आघाडीच्या सर्वसाधारण विमा कंपनीला प्रधान मंत्री फसल बिमा योजना (पीएमएफबीवाय) च्या अंमलबजावणीसाठी प्राधिकृत केले असून ही योजना २०२६ च्या खरीप हंगामातील पिकांसाठी असून अकोला, धुळे, हिंगोली, जळगाव, पुणे सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांसाठी कर्जधारक आणि कर्ज न घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी लागू असेल. ही योजना महाराष्ट्र शासनाने योजनेअंतर्गत अधिसूचित केलेल्या खाली नमूद पिकांसाठी संबंधित जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येईल. सर्व पिके आणि जिल्ह्यांसाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ आहे. पीएमएफबीवाय योजना शेतकऱ्यांना दुष्काळ, पूर, पावसाने ओढ घेणे, भूस्खलन, चक्रीवादळे, वादळे, गारपीट, पुरस्थिती, कीड, रोग आणि इतर अशा विविध बाह्य जोखमींमुळे होणाऱ्या पीक उत्पादनातील नुकसानीविरुद्ध विमा संरक्षण प्रदान करते.

### 'जनता की आवाज' म्हणून दाखल!

पुणे (आरंभ पर्व) : लॉक अप मधल्या कैद्यांसाठी हा प्रवास सोपा नव्हता, नाही का? जसं तुम्हाला वाटलं तसं त्यांनाही वाटलं होतं की आता ते घरात स्थिरावले आहेत. पण हळूहळू ते या सीझनच्या पहिल्या टर्मिनेशनकडे सरकत आहेत. त्यामुळे त्यांना आता खरंच सज्ज व्हावं लागणार आहे, कारण पुढचा टप्पा अजिबात सोपा नाही. या आठवड्यात कंगना रणौत लॉक अप मध्ये 'जनता की आवाज' म्हणून दाखल होणार आहे. 'जनता की आवाज' म्हणजे काय, असा प्रश्न पडतोय ना? तर हे कैद्यांना त्यांच्या प्रवासात प्रेक्षकांशी आणखी जवळ आणणारं एक महत्त्वाचं पाऊल आहे. कंगना चांगली बातमी घेऊन येईल की वाईट? ती कैद्यांच्या टर्मिनेशनमध्ये भूमिका बजावेल का? लॉक अप: सच या सज़ा नेटफ्लिक्सवर दररोज रात्री 8 वाजता स्ट्रीम होत आहे.

### फॅन्सची मागणी आणि पूर्ण

पुणे (आरंभ पर्व) : निर्णय आला आहे आणि फॅन्सनी आपला आवाज बुलंद केला आहे! सोशल मीडियावर गाजलेला, प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा स्फोटक ड्रामा, धक्कादायक ट्विस्ट्स आणि अनफिल्टर्ड ट्रूथ्स मुळे आता लॉक अप: सच या सज़ा आपला डेली रन वाढवत आहे. या आठवड्यापासून ट्रेंडिंग कॅप्टिव्ह रिॲलिटी शो शनिवार ते गुरुवार रात्री 8 वाजता स्ट्रीम होणार आहे. म्हणजेच प्रेक्षकांना दर आठवड्यात एक अतिरिक्त दिवस लॉक अप मध्ये डोकावता येणार आहे. लॉन्चपासून चाहत्यांच्या प्रचंड प्रेमामुळे आणि जबरदस्त प्रतिसादामुळे हा शो रिॲलिटी टीव्ही चाहत्यांसाठी मस्ट-वॉच ठरला आहे. प्रत्येक एपिसोड नवीन चर्चा निर्माण करतो आणि अविस्मरणीय क्षण घेऊन येतो. आता, प्रेक्षकांना पुरेसे वाटत नसल्यामुळे, गुरुवारी एक अतिरिक्त एपिसोडसह ड्रामा आणखी मोठा होणार आहे.

# हर्बालाइफ इंडिया : 'डेट्स कॅरॅमल' फ्लेवर सादर

**बेंगळुरू (दै. आरंभ पर्व)**

आरोग्य आणि वेलनेस क्षेत्रातील आघाडीची कंपनी हर्बालाइफ इंडियाने आपल्या फॉर्म्युला 1 न्यूट्रिशनल शेक मिक्स श्रेणीमध्ये 'डेट्स कॅरॅमल' हा नवीन फ्लेवर बाजारात आणला आहे. खजूर आणि कॅरॅमलच्या चवीचा सुरेख संगम असलेल्या या शेकमध्ये, खजुराच्या घट्ट रसापासून तयार केलेले खजुराचे कुरकुरीत तुकडे (डेट क्रंचेस) समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे हा शेक चविष्ट तर आहेच, शिवाय रोजच्या पोषणाची गरजही पूर्ण करण्यास मदत करतो.




आजचे ग्राहक चवदार, सोयीस्कर आणि रोजच्या आहारात सातत्याने वापरता येतील असे पर्याय शोधत आहेत. ही गरज लक्षात घेऊन हर्बालाइफ इंडियाने आपल्या फॉर्म्युला 1 न्यूट्रिशनल शेकच्या फ्लेवर श्रेणीत डेट्स कॅरॅमल हा नवीन फ्लेवर समाविष्ट केला आहे. यापूर्वी या शेकमध्ये व्हॅनिला, डच चॉकलेट, मँगो, कुल्फी आणि रोझ खीर हे फ्लेवर उपलब्ध होते. या नव्या पर्यायामुळे ग्राहकांना आपल्या आवडीनुसार अधिक फ्लेवरची निवड करता येणार असून, त्याचबरोबर त्यांचा विश्वास असलेल्या उत्पादनाचा लाभही घेता येईल.

या नव्या फ्लेवरच्या लॉन्चबाबत हर्बालाइफ इंडियाचे मॅनेजिंग डायरेक्टर अजय खन्ना म्हणाले, "आजकाल अधिकाधिक लोक अशा पोषणयुक्त आहाराचा शोध घेत आहेत, जो त्यांच्या दैनंदिन जीवनशैलीत सहजपणे बसू शकेल आणि त्यासाठी कोणतीही तडजोड करावी लागणार नाही. लोकांना वापरण्यास सोपे, चविष्ट आणि एकूण आरोग्याला पूरक असे पर्याय हवे आहेत. ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेऊन आम्ही 'डेट्स कॅरॅमल' हा नवीन फ्लेवर विकसित केला आहे. यामुळे ग्राहकांना अधिक पर्याय मिळतील, तसेच फॉर्म्युला 1 श्रेणीची संतुलित पोषण देण्याची ओळखही कायम राहील. आमचे उद्दिष्ट ग्राहकांना त्यांच्या आरोग्यदायी दिनचर्येत सातत्य राखण्यास मदत करणारे अधिक पर्याय उपलब्ध करून देणे आहे. हर्बालाइफमध्ये आम्ही भारतीय ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन वैज्ञानिक संशोधनावर आधारित उत्पादने विकसित करण्यावर भर देत असून, त्यांना अधिक निरोगी आणि सक्रिय जीवन जगण्यासाठी मदत करण्यासाठी कटिबद्ध आहोत. "फॉर्म्युला 1 न्यूट्रिशनल शेक मिक्स – डेट्स कॅरॅमलमध्ये प्रथिने, कार्बोहायड्रेट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांसारख्या आवश्यक पोषक घटकांचे संतुलित मिश्रण आहे, जे शरीराच्या दैनंदिन पोषणाची गरज पूर्ण करण्यास मदत करते. उत्पादनाच्या लेबलवरील शिफारशीनुसार सेवन केल्यास, प्रत्येक सर्व्हिंगमधून 9 ग्रॅम उच्च दर्जाची प्रथिने, 3 ग्रॅम फायबर तसेच 19 प्रकारची जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळतात. हा शेक जेवणाचा पर्याय ('मील रिप्लेसमेंट') म्हणूनही वापरता येतो. तसेच, हा कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेला आहार असल्यामुळे संतुलित आहाराचा भाग म्हणून दिवसभर ऊर्जा टिकवून ठेवण्यास मदत करतो. हा शेक तयार करणे सोपे असून, प्रत्येकाच्या आवडीनुसार त्यात बदलही करता येतात. त्यामुळे व्यस्त आणि धावपळीच्या जीवनशैली असलेल्या व्यक्तींसाठी तो एक सोयीस्कर पर्याय ठरतो. कॅलरी नियंत्रित आहार आणि नियमित मध्यम स्वरूपाच्या व्यायामासोबत दिवसातील एक किंवा दोन वेळचे जेवण याऐवजी हा शेक घेतल्यास तो पौष्टिक जेवणाचा उत्तम पर्याय ठरू शकतो.

विविध फ्लेवर्सच्या वाढत्या श्रेणीमुळे फॉर्म्युला 1 न्यूट्रिशनल शेक मिक्स ग्राहकांना अधिक पर्याय उपलब्ध करून देत असून, त्यांच्या दैनंदिन पोषणाच्या सवयींमध्ये सातत्य राखण्यासही मदत करत आहे.

## बदलत्या आर्थिक ध्येयांसाठी 'फ्लेक्सी ड्रीम प्लॅन'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


बदलत्या जीवनशैलीमुळे ग्राहकांची आर्थिक ध्येयेही अधिक वैविध्यपूर्ण होत आहेत. घर खरेदी, मुलांच्या उच्च शिक्षणासाठी निधी, निवृत्तीचे नियोजन, अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत निर्माण करणे किंवा कुटुंबासाठी आर्थिक वारसा उभारणे यांसारख्या अनेक उद्दिष्टांसाठी एकाच वेळी नियोजन करण्याची गरज वाढत आहे. या पार्श्वभूमीवर एडलवाइस लाइफ इन्शुरन्सने 'फ्लेक्सी ड्रीम प्लॅन' ही वैशिष्ट्यपूर्ण पार्टिसिपेटिंग सेव्हिंग्ज लाइफ इन्शुरन्स योजना सादर केली आहे. एडलवाइस लाइफ इन्शुरन्सचे मुख्य वितरण अधिकारी अनूप सेठ यांनी सांगितले की, पारंपरिक आर्थिक योजना अनेकदा एका विशिष्ट उद्दिष्टापुरत्याच मर्यादित असतात. मात्र, ग्राहकांना संरक्षण, उत्पन्नातील लवचिकता आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षितता एकाच योजनेत मिळावी, या उद्देशाने फ्लेक्सी ड्रीम प्लॅन तयार करण्यात आला आहे. ही योजना पार्टिसिपेटिंग स्वरूपाची असल्याने पॉलिसीधारकांना कंपनीकडून वेळोवेळी जाहीर होणाऱ्या बोनसचाही लाभ मिळू शकतो.

## आंतरराष्ट्रीय ब्रँड्समध्ये इंटर्नशिप व प्लेसमेंट 'सूर्यदत्त'च्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतीक

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटच्या सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ब्रँड्समध्ये इंटर्नशिप व प्लेसमेंट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या सूर्यदत्त कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट अँड ट्रॅव्हल टुरिझमच्या (एससीएचएमटीटी) विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप उमटवत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील हॉस्पिटॅलिटी ब्रँड्समध्ये इंटर्नशिप आणि प्लेसमेंट प्राप्त केली आहे. देशविदेशातील आघाडीच्या हॉस्पिटॅलिटी ब्रँड्समध्ये १०० टक्के इंटर्नशिप व प्लेसमेंट होण्याची परंपरा 'सूर्यदत्त'ने कायम राखली आहे. आंतरराष्ट्रीय हॉस्पिटॅलिटी ब्रँड्समध्ये इंटर्नशिप व प्लेसमेंट 'सूर्यदत्त'च्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन सूर्यदत्त एज्युकेशन



फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी केले. संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हॉस्पिटॅलिटी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना देश-विदेशातील नामांकित हॉस्पिटॅलिटी ब्रँड्समध्ये इंटर्नशिप व करिअरच्या संधी मिळाल्या आहेत. या भरती प्रक्रियेत अनेक नामांकित पंचतारांकित हॉटेल्स, लक्झरी हॉस्पिटॅलिटी ब्रँड्स, प्रीमियम कॅफे, रेस्टॉरंट्स आणि सेवा क्षेत्रातील अग्रगण्य संस्थांनी विद्यार्थ्यांची निवड केली. ही यशोगाथा संस्थेच्या उद्योगाभिमुख शिक्षण, प्रत्यक्ष प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास आणि उद्योग क्षेत्राशी असलेल्या दृढ संबंधांची साक्ष देणारी आहे. बदलत्या जागतिक हॉस्पिटॅलिटी क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन उद्योगसज्ज व्यावसायिक घडविण्याचे कार्य 'एससीएचएमटीटी' सातत्याने करत आहे. विद्यार्थ्यांना फूड अँड बेव्हरेज सर्व्हिस, फ्रंट ऑफिस, हाऊसकीपिंग, कुलिनरी ऑपरेशन्स, कॅफे मॅनेजमेंट आणि कस्टमर सर्व्हिस यांसारख्या विविध विभागांमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय इंटर्नशिप तसेच रोजगाराच्या संधी मिळाल्या. या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागतिक हॉस्पिटॅलिटी मानके, बहुसांस्कृतिक कार्यसंस्कृती आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिक पद्धतींचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. द ओबेरॉय, नरिमन पॉईंट, जेडब्ल्यू मॅरियट, शेरेटोन ग्रँड, नोवाटेल, द वेस्टीन, सयाजी हॉटेल, स्टारबक्स, मॅक्डोनाल्ड्स, कोरिंथियन रिसॉर्ट्स, वॉटर्स बार अँड किचन, कॅफे पीटरसह इतर अनेक नामांकित संस्थांनी विद्यार्थ्यांची विविध पदांसाठी निवड केली.

## परिवर्तनवादी साहित्य चळवळीचा ऐतिहासिक टप्पा

- राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या नियोजनाला प्रारंभ
- 'पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन-२०२६'साठी १२ जुलै रोजी पहिली नियोजन बैठक
- राज्यभरातील साहित्यिक, विचारवंत व सामाजिक कार्यकर्त्यांना सहभागाचे आवाहन




**छत्रपती संभाजीनगर (दै. आरंभ पर्व)**

समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता आणि प्रबोधनाच्या मूल्यांना साहित्याच्या माध्यमातून अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने 'पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन-२०२६' आयोजित करण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी संमेलनाच्या आयोजनाच्या अनुषंगाने पहिली नियोजन बैठक रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता सुभेदारी गेस्ट हाऊस, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. परिवर्तनवादी साहित्य प्रवाह अधिक व्यापक करण्याबरोबरच नवोदित आणि ज्येष्ठ साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार, अभ्यासक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत यांना एकत्र आणून वैचारिक संवादाचे प्रभावी व्यासपीठ निर्माण करण्याचा या संमेलनामागील उद्देश आहे. संमेलनाच्या नियोजनात सर्व घटकांचा सक्रिय सहभाग राहावा, यासाठी या बैठकीत संमेलनाची रूपरेषा, विविध समित्यांची स्थापना, कार्यक्रमाचे नियोजन, स्मरणिका, प्रतिनिधी नोंदणी, आर्थिक नियोजन तसेच विविध उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. राज्यभरातील साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते, मार्गदर्शक, हितचिंतक आणि परिवर्तनवादी चळवळीतील सर्व सहप्रवाशांनी या बैठकीस उपस्थित राहून आपल्या सूचना, मार्गदर्शन आणि सहकार्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. "परिवर्तनाच्या विचारांना शब्दांची ताकद आणि कृतीची दिशा देण्यासाठी प्रत्येक परिवर्तनवादी व्यक्तीचा सहभाग महत्त्वाचा आहे.

## राजीव गांधी गव्हर्नमेंट जनरल हॉस्पिटल येथील पायाभूत सुविधांना बळ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सार्वजनिक आरोग्य क्षेत्राला बळ देण्याची आपली कटिबद्धता दर्शवत ह्युंदाई मोटर इंडिया लि.चा सीएसआर भाग असलेल्या ह्युंदाई मोटर इंडिया फाऊंडेशन तर्फे राजीव गांधी गव्हर्नमेंट जनरल हॉस्पिटल (आरजीजीजीएच) चेन्नई येथील इंटेंसिव्ह सर्जिकल केअर युनिटचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. यामध्ये आपल्या स्पर्श संजीवनी आरोग्य उपक्रमाअंतर्गत प्रगत अतिदक्षता उपचार उपकरणे, क्षमता बांधणी आणि तांत्रिक साहाय्य देण्यात आले आहे.यासाठी



3.07 कोटी रूपयांची गुंतवणूक करण्यात आली असून आयसीयू बेडस,व्हेंटिलेटर्स,डीफिब्रिलेटर्स, मल्टी पॅरामीटर मॉनिटर्स यांसह 169 अद्ययावत वैद्यकीय उपकरणे प्रस्थापित करून कार्यान्वित करण्यात आली आहेत.यासंदर्भात आरोग्यसेवकांना प्रशिक्षण देखील देण्यात आले आहे.

# मनुष्यबळाच्या समस्यांवर राज्यव्यापी सर्वेक्षण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

माहिती तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वाढत्या समस्या, नोकरकपात, रोजगाराची असुरक्षितता तसेच मानसिक, आर्थिक आणि सामाजिक अडचणींचा अभ्यास करण्यासाठी 'व्हाईट टी-शर्ट रिव्होल्युशन' या सामाजिक संस्थेने राज्यव्यापी सर्वेक्षण अभियान हाती घेतले आहे. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून आयटी आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर धोरणात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी 'कॉर्पोरेट न्याय' हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची घोषणा बुधवारी झालेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली.




यावेळी सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ काँग्रेस नेते गोपाळदादा तिवारी म्हणाले की, जगातील प्रगत देशांकडून भारतीय सॉफ्टवेअर अभियंत्यांची संख्या कमी करण्याच्या धोरणाचा परिणाम देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर होत आहे. हजारो कुटुंबांचा आधार असलेल्या या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आलेला हा उपक्रम स्वागतार्ह असून, राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी क्यूआर संकेताद्वारे उपलब्ध असलेला ऑनलाइन सर्वेक्षण अर्ज भरून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. संस्थेचे संस्थापक ऋत्विक धनवट यांनी उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, माहिती तंत्रज्ञान आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, आरोग्यविषयक तसेच कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून त्यावरील उपायांसाठी हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. काही महिन्यांपूर्वी मुठा नदीपात्रात स्वच्छता अभियान राबविल्यानंतर आता कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी राज्यव्यापी लोकचळवळ उभारण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थापक सदस्य आशुतोष प्रदीपराव पवार यांनी वाढती नोकरकपात, रोजगारातील असुरक्षितता, मानसिक ताण, दीर्घ कामाचे तास, वेतनवाढीतील स्थिरता, काम आणि वैयक्तिक आयुष्यातील समतोलाचा अभाव, महिलांसमोरील आव्हाने तसेच रोजगार धोरणांतील त्रुटी यांसारख्या विषयांवर सविस्तर भूमिका मांडली. सर्वेक्षणातून मिळणारी माहिती लोकप्रतिनिधी आणि शासनापर्यंत पोहोचवून आवश्यक धोरणात्मक बदल घडवून आणण्याचा संस्थेचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गोपाळदादा तिवारी यांनी कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांच्या समस्या या केवळ कार्यालयापुरत्या मर्यादित नसून त्या कुटुंब, समाज, अर्थव्यवस्था आणि देशाच्या उत्पादकतेशी निगडित असल्याचे नमूद केले. त्यामुळे हा विषय सामाजिक न्यायाशी संबंधित असून शासनाने आणि समाजाने त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

## ग्रामपंचायत देऊळगाव गाडा, ता. दौंड, जि. पुणे

**बी-१ पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२५-२६**

बी-१ पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२५-२६ग्रामपंचायत देऊळगाव गाडा, ता. दौंड, जि.पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदापद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत देऊळगाव गाडा, ता. दौंड, जि.पुणे यांच्याकडून दिनांक ०९/०७/२०२६ ते दिनांक १५/०७/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक ०९/०७/२०२६ ते दिनांक १५/०७/२०२६ सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोयीनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | निविदा विक्री करण्याची दिनांक | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | लिक्विड वेस्ट मॅनेजमेंट (स्वच्छ भारत मिशन २०२३-२४) | ९९९३४०/- | ५६०/- | ०९/०७/२०२६ ते १५/०७/२०२६ | ९९९३/- |

१) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत देऊळगाव गाडा खाते क्र. ०२२००२५०००००००२ (PDCC बँक शाखा केडगाव) वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत देऊळगाव गाडा ग्रामनिधी खाते ०२२००२५०००००००२ (PDCC बँक शाखा केडगाव) खाते क्र. च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नवे धनादेश / डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करण्याचा, कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा सर्व अधिकार ग्रामपंचायत देऊळगाव गाडा यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत देऊळगाव गाडा, ता. दौंड, जि. पुणे.



खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील कळमोडी धरण सोमवारी रात्री शंभर टक्के भरले. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरूनगर)

# कळमोडी धरण शंभर टक्के भरले

**राजगुरूनगर-किरण खुडे**
**(दै. आरंभ पर्व)**

दमदार पावसामुळे खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील कळमोडी धरण सोमवारी (दि.६) रात्री पावणेबारा वाजण्याच्या सुमारास शंभर टक्के भरले. धरण पूर्ण क्षमतेने भरताच सांडव्यातून ६७५९ क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग आरळा नदीपात्रात सुरू झाला असल्याची माहिती कळमोडी धरण प्रशासनाचे उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांनी दिली.

## ६७५९ क्युसेक्स वेगाने विसर्ग

आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठार व खेड तालुक्यातील पश्चिम व पूर्व भागासाठी वरदान ठरलेले कळमोडी धरण सलग चौथ्या वर्षी शंभर टक्के भरल्याने पश्चिम भागातील नागरिक, शेतकरी आणि पाणीपुरवठा योजनांवर अवलंबून असलेल्या गावांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदा धरणात ४२.८७ दशलक्ष घनमीटर (१.५१४ टीएमसी) इतका जलसाठा झाला आहे. धरण परिसरात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या दमदार पावसामुळे जलसाठ्यात झपाट्याने वाढ झाली आहे. १ जूनपासून धरण क्षेत्रात ५२६ मि.मी पावसाची नोंद झाली आहे. सन २०१० पासून कळमोडी धरण पूर्ण क्षमतेने भरू लागले आहे. या धरणाला कोणत्याही प्रकारचे दरवाजे नसल्याने धरण भरताच सांडव्यातून आपोआप पाण्याचा विसर्ग सुरू होतो.

मागील वर्षी कळमोडी धरण २४ जून रोजी भरले होते, तर यंदा धरण ११ दिवस उशिराने पूर्ण क्षमतेने भरले. कळमोडी धरण भरल्यामुळे चासकमान धरणाच्या पाणीसाठ्यातही झपाट्याने वाढ होण्यास मदत होणार आहे.

कळमोडी प्रकल्पामुळे चिखलगाव, साकुर्डी, देवोशी, कुडे, बांगरवाडी, येनिये, घोटवडी यांसह अनेक गावांना मोठ्या प्रमाणावर सिंचनाचा लाभ मिळतो. तसेच पश्चिम भागातील अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना कळमोडी धरणावर अवलंबून असल्याने पिण्याच्या पाण्याची चिंता दूर झाली आहे. धरण भरल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण असून खरीप हंगामासाठीही मोठा दिलासा मिळाला आहे.

### सतर्कतेचा इशारा

सुरक्षेचा उपाय म्हणून आरळा नदीपात्रालगतच्या सर्व गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीपात्रातील शेतीची अवजारे, साहित्य तसेच जनावरे तातडीने सुरक्षित स्थळी हलवावीत. नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे, असे आवाहन धरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### खेड तालुका काँग्रेस अध्यक्ष विजय डोळस यांचा राजीनामा



राजगुरुनगर (आरंभ पर्व) : खेड तालुका काँग्रेस (आय) कमीटीचे अध्यक्ष विजय शिवराम डोळस यांनी आपल्या पदाचा राजीनामा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे सुपूर्द केला. डोळस यांच्या या राजीनाम्यामुळे काँग्रेस कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यात अस्वस्थता निर्माण झाली आहे. विजय डोळस यांनी पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करीत हा राजीनामा दिला आहे. गेल्या १५ वर्षांपासून विजय डोळस अध्यक्षपदावर कार्यरत होते. त्यामुळे या राजीनाम्याने तालुक्यात काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे संघटन विस्कळीत होणार आहे, असे मानले जाते. 'गेल्या दोन वर्षांत पुणे जिल्ह्यातील पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी खेड तालुक्याच्या कार्यकारिणीला विश्वासात घेतले नाही. यामुळे खेड बाजार समिती, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये पक्षाला मोठा पराभव स्वीकारावा लागला. पक्ष सत्तेत असताना तालुक्यातील कार्यकर्त्यांना कोणत्याही शासकीय समित्यांवर संधी दिली गेली नाही. महत्त्वाच्या कोणत्याही समित्या दिल्या गेल्या नाहीत. हा अन्याय खेड तालुक्यातील कार्यकर्त्यांनी अनेकदा सहन केला. ज्यांना संधी मिळाली त्यांनी पक्षाला धोका दिला, तरी आम्ही प्रामाणिकपणे काम करत राहिलो. मात्र, आता मला आणि माझ्या कार्यकर्त्यांना पक्षात काम करण्याची इच्छा उरलेली नाही, असे विजय डोळस यांनी स्पष्ट केले आहे. हा राजीनामा काँग्रेस पक्षात खेड तालुक्यातील संघटनात्मक हानी झाल्याचे मानले जात आहे.

### व्हॉट्सॲपकडून भारतात तिसऱ्या वार्षिक बिजनेस समिटचे आयोजन

मुंबई (आरंभ पर्व) : मुंबईतील आपल्या वार्षिक बिजनेस समिटच्या तिसऱ्या एडिशनमध्ये व्हॉट्सॲपने आज मेटा बिजनेस एजंट एआयची घोषणा केली. हे एआय प्रत्येक व्यवसायाला त्याच्या प्रत्येक ग्राहकासाठी, प्रत्येक क्षणी उपलब्ध राहण्यास मदत करेल, जिथे त्यांच्या पाठीशी अथांग टीम काम करत आहे असे त्यांना वाटेल. मेटा बिजनेस एजंट व्यवसायांना व्यापक प्रमाणावर जलद आणि अधिक वैयक्तिकृत ग्राहक अनुभव देण्यास सक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. व्यवसाय ग्राहकांचा सहभाग वाढवण्यासाठी आणि आपले कामकाज सुलभ करण्यासाठी प्रयत्न करत आहेत, त्यानुसार मेटा बिजनेस एजंट पहिल्याच संवादापासून अधिक सुसंगत आणि वैयक्तिकृत अनुभव देऊ शकते.

## पुण्यात नवीन प्रकल्प सादरीकरणात १७% वार्षिक वाढ

- **होऊनही निवासी विक्री स्थिर : नाईट फ्रँक इंडिया**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नाईट फ्रँक इंडियाने आपल्या 'इंडिया रिअल इस्टेट H1 2026', या ताज्या अहवालात पुण्याच्या स्थावर मालमत्ता क्षेत्रातील सातत्यपूर्ण गतीवर प्रकाश टाकला असून, 2026 च्या पहिल्या सहामाहीत निरोगी निवासी मागणी कायम राखत शहराने आतापर्यंतचा सर्वाधिक अर्ध-वार्षिक कार्यालयीन भाडेपट्टा नोंदवला आहे. कार्यालयीन बाजारपेठेत एकूण 6.6 दशलक्ष चौरस फूट भाडेपट्टा व्यवहार झाले, जे मागील वर्षीच्या याच कालावधीतील उच्च आधारभूत पातळी असूनही वार्षिक 29% वाढ दर्शवतात. ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स (GCC), फ्लेक्स ऑपरेटर्स आणि थर्ड-पार्टी IT/ITeS कंपन्यांकडून मजबूत मागणीमुळे ही वाढ झाली, तसेच मोठ्या आकाराचे व्यवहार आणि ग्रेड A कार्यालयीन विकासासाठी सातत्यपूर्ण मागणीचाही यात हातभार लागला. निवासी क्षेत्रात, पुण्यात अंतिम-वापरकर्त्यांकडून निरोगी मागणी कायम राहिली असून H1 2026 मध्ये 24,890 घरांची विक्री झाली, जी वार्षिक 2% वाढदर्शवते. बाजारपेठेच्या दृष्टिकोनाबाबत विकासकांचा आत्मविश्वास कायम राहिला असून त्यांनी 31,116 नवीन घरांचे सादरीकरण केले, जी वार्षिक 17% वाढ दर्शवते. निवासी किमतीही चढत्या क्रमाने वाढत राहिल्या असून त्या वार्षिक 5% ने वाढून सरासरी ₹10,063 प्रति चौरस फूट झाल्या.

## पालखी सोहळा : उरुळी कांचन पोलिसांची तयारी पूर्ण

### नागरिकांनी निर्धारित वाहनतळाचाच वापर करावा – पोलीस निरीक्षक विजयमाला पवार



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

संत तुकाराम महाराज पालखी सोहळा–२०२६ च्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या वतीने स्थानिक पत्रकारांची बैठक आयोजित करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत पालखी सोहळ्याच्या नियोजनासंदर्भात विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी, रविवार, १२ जुलै रोजी उरुळी कांचन येथे पालखीचे आगमन होणार असून दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करावे. तसेच वाहने केवळ निश्चित करण्यात आलेल्या वाहनतळावरच उभी करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले. बैठकीस पत्रकार सुनील जगताप, सहदेव खंडागळे, जयदीप जाधव, हनुमंत चिकणे, भाऊसाहेब महाडीक, बापू चौधरी, बापूसाहेब लाड, सदाशिव कांबळे, सुनील तुपे, सुरेश वाळेकर आणि शंकर जराड उपस्थित होते. पोलीस प्रशासनाने पालखी सोहळा शांततेत, सुरक्षित आणि सुरळीत पार पडावा यासाठी सर्व भाविकांनी वाहतूक व सुरक्षा नियमांचे पालन करून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

### वाहनतळाची व्यवस्था पुढीलप्रमाणे

- भवरापूर, अष्टापूर व दत्तवाडी मार्गावरील भाविकांसाठी : प्राथमिक आरोग्य केंद्र, उरुळी कांचन समोरील मैदान.
- शिंदवणे, वळती व सोरतापवाडी मार्गावरील भाविकांसाठी : औदुंबर लॉन्स (शिंदवणे रोड) आणि कांचन सिटी मैदान.
- उरुळी कांचन गावातील नागरिकांसाठी : महात्मा गांधी विद्यालय मैदान.
- प्रयागधाम व कोरेगाव मूळ मार्गावरील भाविकांसाठी : बगाडे वस्तीसमोरील मैदान.
- टिळेकरवाडी, बायफ रोड व गोळे वस्ती मार्गावरील भाविकांसाठी : अस्मिता कॉलेज मैदान.

## खेड तालुक्यात पावसाचे तांडव : अनेक गावांचा संपर्क तुटला




**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यात अतिजोरदार पावसाने धुमाकूळ घातला असून अनेक रस्ते, पुल पाण्याखाली गेले आहेत. तर अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. दोन दिवसांपासून राजगुरूनगर शहरासह तालुक्यात अनेक ठिकाणी विजपुरवठा खंडीत तर काही ठिकाणी विजेचा लपंडाव सुरू आहे. पाईट (ता. खेड) गावच्या पश्चिम बाजूला असलेला पाझर तलाव हा मंगळवारी (दि. ७) रात्रीच्या ढगफुटीसदृष्य अतिवृष्टीमुळे फुटला आहे.

### जनजीवन विस्कळित

परिणामी अहिरे-पराळे गावचा संपर्क तुटला आहे आणि तेथे एक विजेची डीपी वाहून गेली आहे. तसेच पाईट-रौंधळवाडी पुलाचा काही भाग वाहून गेला आहे. तालुक्यातील गुंडाळवाडी येथील पुलावरून पाणी वाहत असल्याने तेथील वाडा गावाकडे जाणारा मार्ग बंद झाला आहे. शिरगाव येथील नेकलेस धबधब्याजवळ टेकडीचा काही भाग तुटून रस्त्यावर आला आहे. कडूस-गारगोटवाडीच्या दरम्यान असलेला (कारामळी) पुल रात्रीच्या पावसामुळे वाहून गेला आहे. तसेच कडूस-राजगुरूनगर पुलावरून पाणी आल्याने कडूस गावाचा संपर्क तुटला आहे. खेड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील कुंडेश्वर डोंगर परिसरासह कडूस गावच्या पाझर तलावाच्या पाणलोट क्षेत्रांत झालेल्या संततधार पावसाने कुमंडला नदीने धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे सन १९९७ नंतर पुन्हा कडूस गावचे ग्रामदैवत असलेल्या भैरवनाथ मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरले आहे. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाल्याने कुमंडला नदीवर असलेला कडूस-शेंडेवाडी- कारामळी दरम्यान असलेल्या पुलाचा दोन्ही बाजूचा भराव वाहून जाऊन रस्ता तुटला आहे. यामुळे कडूस गावाशी असलेला अनेक गावांसह वाड्या-वस्त्यांचाही संपर्क तुटला आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.